Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing… **Date: 30/04/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष

## लोकप्रिय संगीतकार श्रीनिवास खळे



संगीतकार श्रीनिवास खळे यांचा जन्म ३० एप्रिल १९२६ रोजी गुजरातेतील बडोदा येथे झाला. त्यांनी आपल्या कर्णमधुर आणि भावपूर्ण गीतांनी मराठी रसिकांना सहा दशकांहून अधिक काळ मोहिनी घातली होती. ते खळेअण्णा या नावानेही ओळखले जायचे. हिंदी, संस्कृत, गुजराती, बंगाली इत्यादी भाषांमधील गीतांना खळेअण्णांनी जरी स्वरबद्ध केले असले तरी त्यांचे खरे योगदान हे मराठी भावगीत या गीतप्रकारामध्ये आहे. भावगीतांव्यतिरिक्त 'बोलकी बाहुली', जिव्हाळा', 'पोरकी', 'पळसाला पाने तीन' यासारख्या निवडक सहा मराठी चित्रपटांना खळेंनी संगीत दिले आहे. तसेच लता मंगेशकर आणि पं. भीमसेन जोशी या दिग्गजांना घेऊन त्यांनी 'रामश्याम गुणगान' हा गीतसमूह संगीतबद्ध केला होता.
बडोद्यातल्या सयाजीराव गायकवाड संगीत महाविद्यालयात मधुसूदन जोशी यांच्याकडून त्यांनी संगीताचे प्राथमिक शिक्षण घेतले.

बडोदा आकाशवाणीत संगीतकार म्हणून काही वर्षे नोकरी केल्यानंतर खळे मुंबईत आले. पण त्यांना काम मिळेना. या काळात त्यांना त्यांच्या एका मित्राची मोलाची मदत झाली त्याच्यामुळे राहण्या-खाण्याची सोय झाली. इथेच त्यांची ओळख के. दत्ता(दत्ता कोरगावकर) या संगीतकाराशी झाली. खळ्यांनी मग कोरगावकरांचे सहाय्यक संगीतकार म्हणून काम करायला सुरुवात केली. १९५२ साली त्यांची 'गोरी गोरी पान' आणि 'एका तळ्यात होती बदके पिले सुरेख' दोन गाणी असलेली पहिली तबकडी प्रसिद्ध झाली. आशा भोसले यांची तिच्यातील ही गीते तेव्हा खूप लोकप्रिय झाली. या चिमण्यांनो परत फिरा रे , हे त्यांनी संगीतबद्ध केलेले गीत खूप प्रसिद्ध झाले. श्रीनिवास खळे यांचे २ सप्टेंबर २०११ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Apr 30, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401